# अनुक्रमणिका

**प्रकरण १ : मूल म्हणजे मोठ्या माणसाची छोटी प्रतीकृती नव्हे ! १५**

१. मूल म्हणजे लहान माणूस का ? १५

२. प्रत्येक व्यक्तीला जन्मापासून मृत्यूपर्यंत कोणत्या अवस्थेतून मार्गक्रमण करावे लागते ? १९

**प्रकरण २ : पेशी २२**

१. पेशी म्हणजे काय ? २२

२. पेशीचे मूळ घटक कोणते ? २४

३. निरनिराळ्या पेशींचा आकार कसा असतो ? २५

४. निरनिराळ्या पेशी कशा दिसतात ? २६

५. शरिरातील निरनिराळ्या पेशी कोणते कार्य करतात ? २६

६. एक पेशी किती काळ जगते ? २८

**प्रकरण ३ : वाढ २९**

१. वाढ आणि विकास यांतील भेद काय ? २९

२. मुलांची वाढ कशी होते ? २९

३. मुलाच्या वाढीवर कोणत्या गोष्टींचा परिणाम होतो ? ३०

४. मुलाची वाढ कशी आजमावतात ? ३०

**प्रकरण ४ : वजन ३०**

१. जन्मानंतर पहिल्या २ वर्षांत मुलाचे वजन किती वाढते ? ३२

२. मुलाचे वजन प्रत्येक महिन्यात किती वाढते ? ३२

३. मुलाचे वजन किती वेळा करावे ? ३३

४. शतकदर्शक माप म्हणजे काय ? ३३

५. निरनिराळ्या वयाच्या मुलांचे सरासरी वजन किती असते ? ३४

६. ‘आरोग्यसारणी’ म्हणजे काय ? ३६

७. मुलाला योग्य पोषण मिळत नाही किंवा तो गलेलठ्ठ आहे, असे केव्हा समजावे ? ३८

**प्रकरण ५ : उंची** ३९

१. निरनिराळ्या वयात मुलांची उंची किती असते ? ३९

२. प्रतिवर्षी मुलांची उंची किती वाढते ? ३९

३. काही व्यक्ती अगदी बुटक्या, तर काही अधिकच उंच का असतात ? ४१

४. एखादे मूल मोठेपणी किती उंच होईल, हे कोणी सांगू शकते का ? ४२

**प्रकरण ६ : डोक्याचा घेर** ४३

१. आधुनिक वैद्य मुलाच्या डोक्याचा घेर का मोजतात ? ४३

२. मुलांच्या डोक्याचा आकार सारखा का नसतो ? ४३

३. वेगवेगळ्या वयात मुलाच्या डोक्याचा घेर किती असतो ? ४३

४. डोक्याचा आकार मोठा असण्याची कारणे कोणती ? मुलाच्या बुद्धीचा त्याच्या डोक्याच्या आकाराशी संबंध असतो का ? ४४

५. डोक्याचा आकार लहान असण्याची कारणे कोणती ? ४५

**प्रकरण ७ : छातीचा घेर** ४६

१. निरनिराळ्या वयोगटात मुलांच्या छातीचा परीघ किती असतो ? ४६

**प्रकरण ८ : दात** ४७

१. मुलाला दुधाचे आणि कायमचे दात किती असतात ? ४७

२. मुलाचे दुधाचे दात केव्हा वर येतात ? ४८

३. कायमचे दात केव्हा येतात ? ४८

४. शरिराच्या अवयवांचे प्रमाण वयासह पालटते का ? ४९

५. शरिरातील सर्व पेशी आणि अवयव एकाच गतीने वाढतात का ? ४९

६. प्रकृती कशामुळे बनते ? ५१

७. वात प्रकृतीच्या मुलांची लक्षणे कोणती ? ५१

८. पित्त प्रकृतीच्या मुलांची वैशिष्ट्ये कोणती ? ५२

९. लठ्ठ मुलांची वैशिष्ट्ये कोणती ? ५३

१०. समतोल प्रकृतीच्या मुलांची वैशिष्ट्ये कोणती ? ५३

११. एखाद्याची प्रकृती पालटणे शक्य आहे का ? ५३

१२. समतोल प्रकृतीच्या मुलांचा आहार आणि हालचाली यांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते का ? ५४

१३. काही मुले शक्तीवान असून सडपातळ दिसतात, तर काही लठ्ठ असून सहज दमतात, हे कसे घडते ? ५४

१४. चांगली वाढ झालेली काही मुले फिकी (निस्तेज) का दिसतात ? ५५

१५. काही मुले बुटकी असूनसुद्धा शक्तीवान का असतात ? ५५

१६. स्नायूंची शक्ती कशी वाढवावी ? ५५

**प्रकरण ९ : अन्न आणि जीवनसत्त्वे** **५६**

१. मुलांची अधिकाधिक चांगली वाढ होण्यासाठी प्रतिदिनच्या आहारात कोणते घटक असावेत ? ५६

२. अनेक मुले ‘जेवायला चल’ असे म्हटल्यावर का चिडतात ? ५६

३. अधिक खावे म्हणून बहुतेक माता मुलांच्या मागे का लागतात ? ५८

४. मुलांत खाण्याविषयी आवड कशी निर्माण करावी ? ५८

मुलांची प्रकृती जाणून ती सुदृढ बनवा ! ११

५. केवळ आईने भरवले तरच अन्न खाण्याची मुलाची सवय कशी घालवता येईल ? ५९

६. मुलाला त्याचे आवडते पदार्थ पोटभर खाऊ द्यावेत का ? ५९

७. मुलाच्या अन्नाच्या निवडीला किती महत्त्व द्यावे ? ६१

८. बहुतेक मुले रोड आणि हडकुळी का दिसतात ? ६२

९. वाढत्या मुलांना शक्तीवर्धक नियमितपणे दिली पाहिजेत का ? ६२

१०. बाळकडूचा मुलांना उपयोग कसा होतो ? ६४

**प्रकरण १० : विकास** ६५

१. मुलाचा विकास म्हणजे काय ? ६५

२. नवीन जन्मलेल्या मुलाला एखादी वस्तू का पकडता येत नाही ? ६५

३. मूल कसे शिकते ? मुलांत शिकण्याचा उत्साह कसा निर्माण होतो ? ६६

४. मुलाच्या विकासाचे मोजमाप कसे करतात ? ६७

**प्रकरण ११ : विकासाचे टप्पे** ६९

१. विकासाची वाटचाल म्हणजे काय ? ६९

२. विकासाची वैशिष्ट्ये कोणती ? ६९

३. मुलाच्या विकासाचा अंदाज कसा घ्यावा ? ७०

४. विकासाचे टप्पे ठराविक वयातच गाठले जातात का ? ७०

५. मुलाच्या विकासावर कोणत्या गोष्टींचा परिणाम होतो ? ७९

६. काही मुले उशिराने का चालू लागतात ? ८०

७. चालण्यास शिकतांना मुले पाय एकमेकांपासून दूर का ठेवतात ? ८१

८. काही मुलांचे पाय रात्री का दुखतात ? ८१

# प्रस्तावना

प्रिय पालक,

आपल्या मुलाची वाढ सतत होत असते. त्याचे मन आणि बुद्धी हळूहळू परिपक्व होत असतात. प्रत्येकाच्या आयुष्याचा आरंभ एकपेशीय फलित बीजाने होत असतो. या फलित बीजाचे विघटन होऊन त्यापासून २ पेशी बनतात. दोनाच्या चार, चाराच्या आठ अशा वाढत जाऊन पूर्ण वाढ झालेल्या मानवात सुमारे ७५ अब्ज कोटी पेशी असतात. सजीव प्राणीमात्रांची 'वाढ होणे' ही नैसर्गिक प्रवृत्ती असते. या वाढीवर आनुवंशिकता, हॉर्मोन्स्, वातावरण आणि रोग यांचा परिणाम होतो. आपल्या मुलाची वाढ योग्य रीतीने होत आहे किंवा नाही, यावर लक्ष ठेवण्यास सनातनचा प्रस्तुत ग्रंथ आणि 'मुलांची बुद्धी आणि मन यांचा विकास करा !' या दोन ग्रंथांतून आपल्याला मार्गदर्शन लाभेल.

प्रत्येक मुलाची नैसर्गिक प्रकृती (Constitution) वेगळी असते. काही मुले सडपातळ, तर काही लठ्ठ असतात. काहींची उंची अल्प, तर काहींची अधिक असते. हे ग्रंथ वाचून आपल्याला आपल्या मुलाची प्रकृती जाणता येईल आणि त्या अनुषंगाने त्याची प्रकृती अधिक सुदृढ होण्यासाठी त्याला साहाय्य करता येईल.

सर्व प्राणीमात्रांत मनुष्य हा सर्वाधिक बुद्धीमान प्राणी आहे. त्याचे वागणे, हालचाली आणि कार्ये यांवर त्याच्या मेंदूचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या नियंत्रण असते; म्हणून व्यावहारिकदृष्ट्या मुलाच्या विकासाचे मोजमाप त्याचा मेंदू अन् मज्जासंस्था यांच्या परिपक्वतेवरून आजमावले जाते.

मुलाचा विकास आजमावयाला सोपे जावे; म्हणून तो पुढील वर्गीकरणाप्रमाणे बघितला जातो. १. ढोबळ हालचाली, २. कौशल्यपूर्ण हालचाली, ३. सामाजिक विकास आणि ४. बोलणे. या विषयावरील प्रस्तुत पहिल्या ग्रंथात मुलांच्या प्रथम ५ वर्षांतील वाढ आणि विकास यांचे टप्पे सविस्तरपणे दिले आहेत. दुसऱ्या ग्रंथात बुद्धीचे मोजमाप,

बुद्धीवर परिणाम करणाऱ्या गोष्टी, बुद्धी आणि स्मरणशक्ती यांची वाढ करण्यासाठी मार्गदर्शन केले आहे, तसेच मंदबुद्धीची मुले निपजण्याची कारणे, त्यांची काळजी कशी घ्यावी आणि अशी मुले होण्याचे टाळण्यासाठी कोणती काळजी घ्यावी, याचीही चर्चा केलेली आहे. मन आणि मेंदू हे वेगवेगळे अवयव आहेत. मनाची कार्ये, विविध अवस्था आणि उत्क्रांती यांची सविस्तर माहिती दिलेली आहे. संपूर्ण विषयाच्या सविस्तर माहितीसाठी दोन्ही ग्रंथ वाचनीय आहेत.

मुलाचे मन हे निरपराधी, कोमल आणि कोऱ्या पाटीप्रमाणे असते. त्यावर आपण बालपणीच जे संस्कार करू, ते कायमचे रहाण्याची शक्यता असते. आपल्या मुलाला चांगल्या सवयी लावणे, चांगले आदर्श त्याच्यापुढे ठेवणे; तसेच चांगली वर्तणूक आणि सन्मार्गाने जाण्याचे शिक्षण पालकांनीच मुलाला द्यायचे असते.

मुलाच्या मनाचा आणि बुद्धीचा विकास निरोगीपणे करणे, ही कठीण गोष्ट आहे; परंतु या ग्रंथांतील सूचना अन् मार्गदर्शन यांचा उपयोग करून तुम्ही आपल्या मुलाची वाढ आणि विकास अशा चांगल्या रीतीने करू शकाल, ज्याद्वारे तो पुढे निरोगी आणि आदर्श नागरिक होईल अन् आपल्या सर्वांना त्याच्याप्रती अभिमान वाटेल. – **लेखक**


**मुलांच्या विकासासाठी पालकांना मार्गदर्शक सनातनचा ग्रंथ !**

**मुलांची बुद्धी आणि मन यांचा विकास करा !**



- मुलांची बुद्धीमत्ता दर्शवणाारे विकासाचे विविध टप्पे
- निरोगी मनाची व्यक्ती ओळखण्याची लक्षणे
- भावनांचे कार्य आणि त्यांमुळे होणारे लाभ अन् हानी
- मुलांच्या व्यक्तीमत्त्व विकासावर परिणाम करणारे घटक